सकाळ



**कोल्हापूर :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रचारार्थ शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा पथनाट्यातून प्रचार

कोल्हापूर, ता. २८ : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा विद्यार्थ्यांमध्ये प्रचार आणि प्रसार व्हावा, या उद्देशाने आज शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या सामाजिक कार्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याचे सादरीकरण केले.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०'ला यंदा तीन वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून शासनाने २४ ते २९ जुलै दरम्यान राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताहाचे आयोजन केले. विद्यापीठात यानिमित्ताने पोस्टर, निबंध, वक्तृत्व स्पर्धा, पथनाट्य, रिल्स स्पर्धांचे आयोजन केले आहे. या उपक्रमांतर्गत आज विद्यापीठात 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा'विषयी जनजागृतीपर पथनाट्याचे आयोजन केले. या धोरणाच्या विविध पैलूंवर विद्यार्थ्यांनी प्रकाश टाकला. ओमकार संकपाळ, गायत्री चव्हाण, कोमल गरड, वासवी पोतदार, सायली शहापूरकर, शिवानी माने, विद्या करचले, शुभांगी भोसले यांनी सादरीकरण केले. यासाठी डॉ. ऊर्मिला दशवंत आणि डॉ. मुनीर मुजावर यांनी परिश्रम घेतले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी प्रिया देशमुख, उपकुलसचिव गजानन पळसे, डॉ. उत्तम सकट, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक डॉ. नितीन माळी, एमएसडब्ल्यू विभागाचे समन्वयक डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. उमेश गडेकर, गजानन साळुंखे, चेतन गळगे, तानाजी घागरे, मृणालिनी जगताप, प्रताप खोत उपस्थित होते.

तरुण भारत

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जागृतीसाठी विद्यापीठात पथनाट्य

कोल्हापूर : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला तीन वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून राज्य शासनाच्या वतीने २४ ते २९ जुलै रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह झाला. या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा विषयी जनजागृतीपर पथनाट्याचे सादरीकरण केले. पथनाट्यातून धोरणाच्या विविध पैलूंवर विद्यार्थ्यांनी प्रकाश टाकला. शिवाजी विद्यापीठात पोस्टर, निबंध, वक्तृत्व स्पर्धा, पथनाट्य, रिल्स स्पर्धांचे आयोजन केले होते. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी प्रिया देशमुख, उपकुलसचिव गजानन पळसे, डॉ. उत्तम सकट, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक डॉ. नितीन माळी, एमएसडब्ल्यू विभागाचे समन्वयक डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. उमेश गडेकर, डॉ. गजानन साळुंखे, चेतन गळगे, डॉ.तानाजी घागरे, मृणालिनी जगताप, डॉ. प्रताप खोत उपस्थित होते. ओमकार संकपाळ, गायत्री चव्हाण, कोमल गरड, वासवी पोतदार, सायली शहापूरकर, शिवानी माने, विद्या करचले, शुभांगी भोसले या विद्यार्थ्यांनी पथनाट्याचे सादरीकरण केले. डॉ. उर्मिला दशवंत आणि डॉ. मुनीर मुजावर यांनी परिश्रम घेतले.

पुण्यनगरी

# पथनाट्यातून शैक्षणिक धोरणाचा प्रसार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा विद्यार्थ्यांमध्ये प्रचार आणि प्रसार व्हावा, या उद्देशाने शुक्रवारी शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या सामाजिक कार्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याचे सादरीकरण केले. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०'ला यंदा तीन वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या वतीने २४ ते २९ जुलैदरम्यान राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत शुक्रवारी विद्यापीठात 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा'विषयी जनजागृतीपर पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. या धोरणाच्या विविध पैलूंवर विद्यार्थ्यांनी प्रकाश टाकला.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी प्रिया देशमुख, उपकुलसचिव गजानन पळसे, डॉ. उत्तम सकट, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक डॉ. नितीन माळी आदी उपस्थित होते.

29 JUL 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : विकसित देशाच्या दिशेने वाटचाल

**ज्ञान हीच शक्ती आहे. शतकानुशतके ज्ञानाचा व्यापक स्रोत राहिलेल्या वेद आणि उपनिषदांमध्ये भारताची समृद्ध ज्ञानपरंपरा क्षमता दिसून येते. नालंदा आणि तक्षशिला यासारख्या प्राचीन भारतीय विद्यापीठांसह भारत गतकाळात आंतरराष्ट्रीय ज्ञान केंद्र राहिला आहे. आज २९ जुलै रोजी राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा तिसरा वर्धापन दिन, दोन दिवसीय अखिल भारतीय शिक्षण समागम, शिक्षणाचा महाकुंभ म्हणून साजरा करत आहोत.**

ब्रिटनने दुसऱ्या औद्योगिक क्रांतीदरम्यान जगाचे नेतृत्व केले, तर तिसऱ्या वेळी अमेरिकेने नेतृत्व केले. आज भारत ब्रिटनला मागे टाकून जागतिक स्तरावर पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. पुन्हा ज्ञानाचे केंद्र बनण्याची आणि नवीन तसेच उदयोन्मुख तंत्रज्ञानातील झपाट्याने सरसावणाऱ्या चौथ्या औद्योगिक क्रांतीकडे जगाला नेण्यासाठी नेतृत्व करण्याची भारतासाठी हीच योग्य संधी आहे. हे अपेक्षित संक्रमण होत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये भारताच्या शिक्षण प्रणालीला २१ व्या शतकातील जागतिक ज्ञान महाशक्तीत रूपांतरित करण्याचा दृष्टिकोन मांडला. शाळेत जाणाऱ्या २६० दशलक्षाहून अधिक आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या ४० दशलक्षाहून अधिक विद्यार्थ्यांसह भारताची शिक्षण व्यवस्था ही जागतिक स्तरावर सर्वात मोठी शिक्षण व्यवस्था आहे. जनतेसह संबंधित भागधारक घटकांशी विस्तृत चर्चा केल्यानंतर ३४ वर्षांच्या कालखंडानंतर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी)-२०२० ची सुरुवात केली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला गेल्या तीन वर्षांत लक्षणीय यश मिळाले आहे. ८० टक्क्यांपेक्षा अधिक बालकांमध्ये त्यांच्या मेंदूचा संकलित विकास ८ वर्षांच्या आधी होतो, असे आढळले आहे. हे लक्षात घेऊन प्रथमच शालेयपूर्व देखभाल आणि शिक्षण (ईसीसीई) आता औपचारिक शालेय शिक्षण प्रणालीत सामावून घेतले आहे. याव्यतिरिक्त ३-८ वर्षे वयोगटातील बालकांसाठी मूलभूत टप्प्यासाठी (एनसीएफ-एफएस) प्रथम राष्ट्रीय अभ्यासक्रम , आराखड्यात खेळ आधारित अध्यापनशास्त्रावर भर दिला आहे. या आराखड्यात संभाषण, कथा, संगीत, कला, हस्तकला, खेळ, निसर्गाच्या सानिध्यातील सहली आणि साहित्य तसेच खेळण्यांसह परस्परसंवादी खेळ यासारख्या उपक्रमांचा समावेश आहे. शाळांनी अवलंब करण्यासाठी जादूची पेटी यासारखे उपक्रम तयार केले आहेत.

राष्ट्रीय निपुण भारत अभियानाला २०२६ पर्यंत मूलभूत साक्षरता आणि गणन क्षमता प्राप्त करण्यासाठी पूरक असलेली एनसीएफ-एफएसवर आधारित इयत्ता पहिली आणि दुसरीची पाठ्यपुस्तके प्रकाशित केली आहेत. आगामी शालेय शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याच्या अनुषंगाने सुमारे १५० नवीन पाठ्यपुस्तके उपलब्ध करून दिली जातील. ही अमृत काळासाठीची पुस्तके असतील आणि एनईपी - २०२० अंतर्गत बहुभाषिक शिक्षणाच्या ध्येयदृष्टीला चालना देणाऱ्या किमान २२ भारंतीय भाषांमध्ये ती तयार केली जात आहेत. पाठ्यपुस्तकांच्या डिजिटल आवृत्त्या पीएम ई-विद्याद्वारे सुलभतेने आणि मागणीनुसार उपलब्ध करून दिल्या जात आहेत. एनईपीच्या अस्सल उद्दिष्टांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भविष्यवेधी पीएम श्री शाळाही देशभरात उभारल्या जात आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० ने व्यावसायिक शिक्षणाचे सामान्य शिक्षणासोबत एकीकरण करणे आणि त्यास मुख्य प्रवाहात आणण्यावर विशेष भर दिला आहे. शालेय स्तरावर कौशल्य अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी




आम्ही समग्र शिक्षण आणि स्किल इंडिया मिशन यांच्यात समन्वय साधत आहोत. यातून विद्यार्थी आणि शाळाबाह्य मुलांना सर्वसमावेशक कौशल्य तसेच व्यावसायिक प्रशिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध करण्यासाठी देशभरातील शाळांमध्ये ५ हजार कौशल्य केंद्रांची स्थापना केली जात आहे. याशिवाय एक अनोखा राष्ट्रीय श्रेयांक आराखडा (एनसीआरएफ) सादर केला आहे. याअंतर्गत औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण, शाळांचे विस्तारीकरण, उच्च आणि कौशल्य शिक्षण तसेच प्रशिक्षण यांचे श्रेयांक दिले जातात. एनसीआरएफमुळे विविध स्तरांवर एकापेक्षा अधिक अभ्यासक्रमांत प्रवेश आणि निर्गमन करता येण्यासह विद्यार्थ्यांना नंतरही उच्च शिक्षण प्रणालीमध्ये पुन्हा प्रवेश करणे शक्य होणार आहे. यादरम्यान विद्यार्थ्यांच्या ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट (एबीसी) मध्ये त्यांचे श्रेयांक जमा राहतील. तंत्रज्ञान हे विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रम ऑनलाईन शिकण्यासाठी सक्षम करण्याबरोबर अतिरिक्त लवचिकता देत आहे. आता स्वयंम पोर्टलवर विद्यार्थ्यांना ऑनलाईन अभ्यासक्रमांद्वारे श्रेयांकही मिळवता येणार आहेत. लवकरच भारतात अशा एका विशेष डिजिटल विद्यापीठाची स्थापना केली जाणार आहे.

मागणी आधारित कौशल्यांच्या बळकटीकरणासाठी सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग क्षेत्रासह अन्य रोजगार नियोक्त्यांसोबत दुवा साधणे आणि उद्योजकता योजनांमध्ये प्रवेश सुलभ करण्यासाठी एकात्मिक स्किल इंडिया डिजिटल मंचासह कौशल्यासाठीची डिजिटल परिसंस्था आणखी मजबूत करण्यात आली आहे. याशिवाय आम्ही कुशल उमेदवारांचे जागतिक पातळीवर काम करणे सुलभ करण्यासाठीही प्रयत्न करत आहोत. तरुणांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण देणे आणि कुशल कामगारांसाठी परदेशात संधी वाढवण्यासाठी देशभरात ३० भारतीय आंतरराष्ट्रीय कौशल्य केंद्रे स्थापन केली जात आहेत. औद्योगिक क्रांती- ४.४ साठी आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण असे ३३० हून अधिक नवीन अभ्यासक्रम विकसित केले गेले आहेत.

शिकण्यातील भाषेचा अडथळा दूर करण्यासाठी अनेक उच्च शिक्षण संस्था आता अनेक भारतीय भाषांत तांत्रिक अभ्यासक्रम उपलब्ध करत आहेत. भाषांतससाठीची कृत्रिम बुद्धिमत्ता साधने विविध भारतीय भाषांत पाठ्यपुस्तकांचे भाषांतर सुलभ करत आहेत. जीईई, नीट आणि सीयूईटीसारख्या प्रमुख प्रवेश परीक्षा आता १३ भाषांमध्ये उपलब्ध आहेत. शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याच्या पार्श्वभूमीवर भारतातील शैक्षणिक संस्था परदेशात शाखा सुरू करत आहेत. झांझिबार-टांझानिया येथे नियोजित शाखेसह आयआयटी मद्रास जागतिक स्तरावर जात आहे. संयुक्त अरब अमिरातीमध्ये आयआयटी दिल्लीची शाखा स्थापन करण्याच्या सामंजस्य करारावरही या महिन्याच्या सुरुवातीला पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आली.

**- धर्मेंद्र प्रधान,**
(लेखक केंद्रीय शिक्षण आणि कौशल्य विकासमंत्री आहेत.)

सकाळ

# विद्यापीठात घेता येणार आता एम. ए. योगशास्त्राचे शिक्षण

कोल्हापूर, ता. २८ : योगशास्त्राचे उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या, करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठातर्फे सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून एम. ए. (योगशास्त्र) हा द्वैवार्षिक पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती विद्यापीठाचे आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांनी आज दिली.

विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार अधिविभागामार्फत योगशास्त्र या विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याच्या प्रस्तावाला अधिकार मंडळांची मान्यता प्राप्त झाली आहे. योग क्षेत्रामध्ये व्यावसायिक कारकीर्द घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पदवीनंतर लगेचच हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. विद्यापीठात प्रथमच अशा स्वरूपाचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ कॅम्पसमध्ये उपलब्ध केला जात आहे. त्यासाठी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, श्रीकृष्ण महाजन, मेघा गुळवणी, सरिता ठकार यांचे मार्गदर्शन लाभले असल्याचे डॉ. पवार यांनी सांगितले.

## अभ्यासक्रम असा

- एम. ए. योगशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमात शरीरशास्त्र, शरीरक्रिया विज्ञान, विविध प्राचीन आणि आधुनिक योग ग्रंथातील हठयोग, शास्त्रीय योग, निसर्गोपचार, आयुर्वेदाचे सिद्धांत, योग तत्त्वज्ञान, पूरक चिकित्सा पद्धती, मानसशास्त्र, व्यक्तिमत्त्व विकास इत्यादी गोष्टींसह सर्वसमावेशक अभ्यासक्रम आहे.

पुण्यनगरी

# विद्यापीठात यंदापासून एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रम सुरू

**कोल्हापूर :** योगशास्त्राचे उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या व योग क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठातर्फे सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून एम.ए. (योगशास्त्र) हा द्वैवार्षिक पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती विद्यापीठाचे आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ रामचंद्र पवार यांनी दिली.

विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार अधिविभागामार्फत योगशास्त्र या विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याच्या प्रस्तावाला अधिकार मंडळांची मान्यता प्राप्त झाली आहे. योग क्षेत्रामध्ये व्यावसायिक कारकीर्द घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पदवीनंतर लगेचच हा अभ्यासक्रम उपलंब्ध आहे. शिवाजी विद्यापीठात प्रथमच अशा स्वरूपाचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ कॅम्पसमध्ये उपलब्ध केला जात आहे. एम.ए. योगशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमात शरीरशास्त्र, शरीर क्रिया विज्ञान, विविध प्राचीन आणि आधुनिक योग ग्रंथांतील हठयोग, शास्त्रीय योग, निसर्गोपचार, आयुर्वेदाचे सिद्धांत, योग तत्त्वज्ञान, पूरक चिकित्सा पद्धती, मानसशास्त्र, व्यक्तिमत्त्व विकास इत्यादी गोष्टींसह सर्वसमावेशक अभ्यासक्रम आहे. यासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. मेघा गुळवणी आणि डॉ. सरिता ठकार यांचे मार्गदर्शन लाभले असल्याचेही डॉ. पवार यांनी सांगितले.

29 JUL 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यंदा शिवाजी विद्यापीठात योगशास्त्र अभ्यासक्रम

## अधिकार मंडळातर्फे मान्यता : विद्यापीठ कॅम्पसमध्ये रंगणार योगशास्त्राचे धडे : दोन वर्षांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार अधिविभागामार्फत योगशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रस्तावाला अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे. यंदाच्या २०२३/२४ या शैक्षणिक वर्षापासून दोन वर्षाचा एम. ए. योगशास्त्र अभ्यासक्रम सुरू होणार आहे. यंदा प्रथमच विद्यापीठ कॅम्पसमध्ये योग शास्त्राचे धडे रंगणार आहेत.

योगशास्त्राचा पदवी प्राप्त झाल्यानंतर विविध क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. भारतात योग क्षेत्रामध्ये बाजारपेठ वाढत आहे. योगप्रेमी, जिज्ञासूंसह विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. शिवाजी विद्यापीठात प्रथमच अशा स्वरूपाचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ कॅम्पसमध्ये उपलब्ध केला जात आहे.

केंद्राने योग आणि भारतीय चिकित्सा पद्धतींच्या प्रचार-प्रसारासाठी आयुष मंत्रालयाची स्थापना केली. प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालये, विद्यापीठात योगविषयक शिक्षण व संशोधन सुरू आहे. सरकारी आस्थापनां, मंत्रालयींन विभाग येथेही उच्चशिक्षित

- **विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी**
- **भारतात योगक्षेत्राला वाढती बाजारपेठ**



योगशिक्षकांची गरज आहे. विविध देशांमध्ये भारतीय योग प्रशिक्षकांची मागणी वाढत आहे. युनेस्कोनेही भारतातील योगाभ्यासाला मानवी संस्कृतीचा अमर वारसा, म्हणून मान्यता दिली आहे. स्थानिक स्तरावर योगशास्त्राचे उच्च शिक्षण उपलब्ध व्हावे रोजगारांसाठी मनुष्यबळाची निर्मिती व्हावी, या उद्देषाने विद्यापीठाने योगशास्त्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केला, अशी माहिती आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांनी दिली. यासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. मेघा गुळवणी आणि डॉ. सरिता ठकार यांचे मार्गदर्शन लाभले.

### सर्वसमावेशक अभ्यासक्रम

एम.ए. योगशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमात शरीरशास्त्र, शरीर क्रिया विज्ञान, विविध प्राचीन आणि आधुनिक योग ग्रंथातील हठयोग, शास्त्रीय योग, निसर्गोपचार, आयुर्वेदाचे सिद्धांत, योग तत्त्वज्ञान, पूरक चिकित्सा पद्धती, मानसशास्त्र, व्यक्तिमत्व विकास आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

### रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध

योगशास्त्राची पदवी प्राप्त झाल्यानंतर युजीसी नेट, पीएचडी करून सहाय्यक प्राध्यापक, प्राध्यापक पदावर काम करण्याची संधी उपलब्ध आहे. तसेच सरकारी हॉस्पिटल, प्राथमिक आरोग्य केंद्रात योग प्रशिक्षक, योग चिकित्सक म्हणून संधी मिळू शकते. नामांकित खाजगी हॉस्पिटल्समध्ये योगथेरपिस्ट म्हणून संधी आहेत. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, योग संस्था, हॉटेल्स, स्पा, जिम (व्यायाम शाळा) या ठिकाणीही रोजगाराच्या संधी आहेत.

### राष्ट्रीय व वैश्विक स्तरावर परिवर्तनासाठी योग सक्षम

शिवाजी विद्यापीठामध्ये यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून दोन वर्षाचा एम. ए. योगशास्त्र अभ्यासक्रम सुरू होणार आहे. योग क्षेत्रामध्ये नवनवीन रोजगाराच्या संधीमध्ये वाढ होत आहे. 'हिल इन इंडिया' व 'हिल बाय इंडिया' या दोन्ही उपक्रमांमध्ये योग केंद्रस्थानी आहे. व्यक्तीच्या जीवनासह राष्ट्रीय आणि वैश्विक स्तरावर परिवर्तन घडवून आणण्यासाठी योग सक्षम आहे.

**– डॉ. रामचंद्र पवार, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग संचालक, शिवाजी विद्यापीठ**

### कोविड काळात बाजारपेठेत योग क्षेत्राची १५४ टक्क्यांनी वाढ

देशात योगाविषयी सेवा बाजार २.६ अब्ज अमेरिकी डॉलर्सचा आहे. योग क्षेत्राची एकूण बाजारपेठ ८० अब्ज डॉलर्सची आहे. कोविड काळात योग क्षेत्राशी संबंधित उपकरणांची बाजारपेठ १५४ टक्क्यांनी वाढली. परदेशातही योग संबंधित पदवीचे शिक्षण दिले जाते. योग शाळा, योग थेरपी सेंटरमध्ये वाढ होत आहे.

तरुण भारत

# राष्ट्रीय सेवा योजनेची कार्यनियोजन बैठक

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा कार्यनियोजन बैठक विवेकानंद कॉलेजमध्ये पार पडली. डॉ. टी. एम. चौगले यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. डॉ संजय पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संदीप पाटील यानी आभार मानले. डॉ. राजश्री पाटील व डॉ. अस्मिता तपासे यांनी सुत्रसंचालन केले. यावेळी प्रा. आदिनाथ कांबळे, प्रा. पी. आर. बागडे, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. एस. डी. शिंदे, डॉ. जी. एस. उबाळे आदी उपस्थित होते.

तरूण भारत

थोडक्यात महत्त्वाचे

# विद्यापीठातर्फे ओंकार, सिद्धांत, सुदेष्णा, रेश्मा, राणीचा गौरव

कोल्हापूर : चेंगडू (चीन) येथे होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या पाच खेळाडूंची भारतीय विश्वविद्यालय संघात निवड झाली आहे. या कामगिरीबद्दल कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी पाचही खेळाडूंचा सत्कार केला. विद्यापीठाच्या इतिहासात जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पाच खेळाडूंची एकाच वेळी निवड होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स इचलकरंजीचा ओंकार कुंभार ८०० मीटर धावणे, आजरा महाविद्यालयाचा सिद्धांत पुजारी ३ हजार मीटर स्टीपल चेस, साताऱ्यातील यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्सची सुदेष्णा शिवणकर १०० मीटर धावणे व ४ बाय १०० मीटर रिलेतून प्रतिनिधीत्व करणार आहे. डी. पी. भोसले महाविद्यालयाची (कोरेगाव) रेश्मा केवटे, राणी मुचंडी या हाफ मॅरेथॉनमधून स्पर्धेत उतरणार आहेत. दक्षिण कोरियातील एशियन अंडर-२० ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमधील ४ बाय १०० रिलेमध्ये सुवर्णपदक विजेत्या रिया पाटीलचाही सत्कार केला. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, डॉ. डी. बी. बिरनाळे, डॉ. धनंजय पाटील, स्मिता कुंभार उपस्थित होते.